**प्रसिद्धीसाठी**

मार्च ३०, २००७

# मिठी नदीच्या स्वच्छतेच्या कामातील दिरंगाईमुळे या पावसाळयात सुद्धा कुर्ला, एअरपोर्ट. कालिना, साकीनाका, विद्याविहार पाण्याखाली जाण्याची शक्यता

**–डॉ. किरीट सोमैया**

भाजप नेते डॉ. किरीट सोमैया यानी येत्या पावसाळ्यात कुर्ला, कल्पना टॉकिज, लाल बहादूर शास्त्री मार्ग, क्रांति नगर, साकिनाका, एअरपोर्ट पुन्हा एकदा पाण्याखाली जाण्याची भिती व्यक्त केली आहे.

मिठी फेज २ च्या कार्यवाहीतील दिरंगाईमुळे पुन्हा एकदा कोट्यावधि रुपये पाण्यात जाण्याची शक्यता आहे. डॉ. सोमैया यानी अशी चिंता व्यक्त केली कि, त्यामुळे जुलै महिन्यात किमान ७ दिवस सर्व दैनंदिन कामकाज विस्कळित होईल. मिठी नदीचे पात्र १०० फूट करण्याच्या पहिल्या टप्प्यातील कामामुळे जरी काहीसा दिलासा मिळाला असला तरी, पुढची दिरंगाई टाळायला हवी होती.

डॉ. सोमैया यानी राज्य सरकारच्या उदासीनतेची आणि सुस्तपणाची निर्भत्सना केली. २ वर्षानंतरहि रुंदी नक्की झालेली नाही. सीडब्ल्युपीआरएस, आयआयटी, चितळे समिती यांचे सर्व अहवाल १२ महिन्यांपूर्वीच मिळाले आहेत. सरकार, एमएमएआरी, महापालिका आणि मिठि प्राधिकरण हे १२ महिने काय झोपा काढीत होते काय? हा बेजबाबदारपणा आहे. या बांधिलकीच्या वानवेने मुंबईकर चिंतीत आहे, डॉ. सोमैया म्हणाले.

सरकारने न्यायालयाची आणि मुंबईकरांची दिशाभुल केली. उद्घाटन, निविदा मागविणे वगैरे मोठ्या धुमधडाक्यात केले. नोव्हेंबरमधे निविदा जाहीर केल्या आणि स्वीकारण्यात आल्या. हे कसे काय करण्यात आले? हे धक्कादायक आहे.

फेब्रुवारी २००७ मध्ये मुंबई महापालिकेच्या निवाडणुकीपूर्वी चुकीची प्रतिमा निर्माण करण्यासाठी मुंबईकरांची फसवणूक करण्यात आली.

डॉ. सोमैया यानी दावा केला कि, पावसाळ्यापूर्वी २ ऱ्या टप्प्याचे काम सुरू करणे अशक्य आहे. त्यानी पुढे असाहि इशारा दिला कि, लाल बहादूर शास्त्री मार्ग, कुर्ला, कालिना येथील २० लाख लोकांना यंदाच्या पावासाळ्यातहि पूराला आणि पाणि तुंबण्याच्या त्रासाला तोंड द्यावे लागेल.

प्रसिध्दी सचिव